म. ग्रं. सं. ठाणें
विषय काव्य
सं. क्र. ३९९

१९९८
ओळ - ३८१

म. ग्रं. सं. ठाणें

| विषय | |
|---|---|
| काव्य | लेखक ज. रा. गोखलेकर |
| संग्रहालय क्रमांक | पुस्तकाचें नांव श्री गजाननपद्य |
| ३९७ | ३९७ रत्नमाला |

सन १९३०

३९४ -

काव्य

म. ग्रं. सं. ठाणे
विषय काव्य
सं. नं ३२४

संग्रह
3

॥ श्रीगजानन प्रसन्नोऽस्तु ॥



# श्रीगजाननपद्यरत्नमाला

अथवा

## उपदेशपर व स्तुतिपर एकवीस पदें.

रचयिता ( पूर्वाश्रमी ),

लक्ष्मण रामचंद्र गोळवलकर.

प्रकाशक,

अनंत नरहर महाजन.

आवृत्ति दुसरी.

इ. स. १९३०.

क्र. ०५ १०
८-२-३२

श्री.

# श्रीगजाननपद्यरत्नमाला.

## मंगलाचरण.

शार्दूलविक्रीडित,

॥ सृष्टीपूर्विल जो, कृपाघन अशा त्रैमूर्ति पाळीतसे ॥
॥ सर्वांचाहि रिपू अजिंक्य यम जो त्यालाहि दंडीतसे ॥
॥ सूर्यादी सकल ग्रहांहुनि बहु दैदीप्यमान् जो असे ॥
॥ ऐसा तो जगदीश सन्मति मला देवो मि वंदीतसे ॥

### पद १ लें

चाल— राधाधर मधुमिलिंद.

॥ त्वच्चरणीं मन जडो ॥ गजमुखा कांहिं सुकृत मज घडो ॥ध्रु०॥
॥ अघराशीतृण सर्वहि माझें, तव नामाग्नीं पडो ॥ गजमुखा० ॥१॥
॥ त्वन्नामपराङ्मुखकर दुर्गुण, कृपाकटाक्षें झडो ॥ गजमुखा० ॥२॥
॥ भवभयहारक नाम तुझें तें, मम रसनेवरि चढो ॥ गजमुखा० ॥३॥
॥ चपलासम अति चंचल मम मन, वैराग्यें कडकडो ॥ गजमुखा० ॥४॥

## पद २ रें.

रा. कल्याण. चाल—लंबोदर गिरिजा नंदना.

॥ आम्हि भजुं निशिदिनिं गणराया ॥ वाहुं तया ही काया ॥आम्हि भ०॥ ध्रु० ॥ गजमुख सुखकर नाम जयाचें । जे नर घेती अपुल्या वाचें । होतें निरसन पातक त्यांचें । वंदु तयाच्या पाया ॥आम्हि०॥१॥ ॥ व्रत संकष्टिचतुर्थीचें तें । केल्यानें इच्छित फल देतें । भयकारक भवपारहि नेतें । सिद्ध असुं आचराया ॥आम्हि० ॥२॥

## पद ३ रें.

चाल—सुंदरमुख तुंदिलतनु.

॥ लंबोदर एकदंत गौरिनंदना ॥
॥ करि कृपा तुं दीनावरि हे गजानना ॥ ध्रु०॥
॥ शिणलों संसारिं सारि कठिण यातना ॥
॥ अभय करुनि उपजवि गा सुमति मन्मना ॥
॥ झडकरि तव चरण दावि पुरवि कामना ॥
॥ माता, ताता, त्राता, तूंचि एक हा विवेक ॥
येतसे कलिमलनाशना ॥ लंबो० ॥१॥

## पद ४ थें.

चाल—भाव धरारे आपुलासा देव०

॥ व्यर्थचि गेला जन्मुनि तो नरदेहाला ॥ध्रु०॥ उपासि न घडली

गजमुखसेवा । केला फुकट जन्मवारि हेवा । विसरुनि अपुल्या कारिचा ठेवा । स्वघात केला ॥ जन्मु० ॥१॥ भवि काबाड—कष्ट केल्यानें । बहु आप्तजनोदर भरण्यानें । धनदारागृहसुतपाशानें । मुक्त न झाला । जन्मु० ॥२॥ मज तम भवार्णवीं बुडत्याला । करिती संत सदुपदेशाला । होतां विवेक जागृत अपुला । पटे मनाला । जन्मुनि०॥३॥

## पद ५ वें.

रा० हमीर चाल—अंबे जगजननी

॥ जयजयकार करा ॥ जन हो जयजयकार करा । आनंदाचा दिन आज खरा ॥ जयजय०॥ धृ०॥ महाराज गणराजविराजित—सिंहासन-शोभा । आल्हादविते इंदुपरी जी । सकलहि नारिनरा जनहो ॥ज०॥१॥ तुंदिलतनुवरि सिंदुरचर्चित शुंडा हे रुळते । गजमुख ऐसा सन्निध असतां । दुःख सर्व विसरा ॥जनहो०॥ २ ॥

## पद ६ वें.

राग खमाज—ताल त्रिवट.

काव्य 107
8-2-32

॥ दयाघन सत्वर धांव विभो ॥ धृ० ॥
॥ हीन दीन मी मीन जलाविण । सागर तूंचि प्रभो ॥ द० ॥ १ ॥
॥ या भवरोगें व्याप्त अशा मज । अमृत तूंचि प्रभो ॥ द० ॥ २ ॥
॥ षड्रिपुनक्रमुखीं मी कुंजर । श्रीहरि तूंचि प्रभो ॥ द० ॥ ३ ॥

## पद ७ वें.

रा. कालिंगडा—चाल—निजरूप दिका.

|| भजरे सुमना मृडनंदना । शरणागत अघकंदना || धृ० ||
|| हरुनि कुमति तुज देइल सुमती । भक्तिपुरस्सर वंदिना || भज० ||१||
|| गणेंद्र सकलाभूतीं मानुनि । कवणातेंही निंदि ना || भज० || २ ||
|| नरदेहीं सार्थक कांहीं करि । पुनरपि ये आशि संधि ना || भज० ||३||

## पद ८ वें.

चाल—चलाबाई पांडुरंग पाहूं.

|| वरेण्याला गजमुख ऐसा योग सांगता झाला ।
|| सूर्य–शक्ति–शिव–विष्णु–गणपतिंत मानु नको भेदाला || धृ० ||
|| संपत्तीचा, स्त्रीचा किंवा पुत्राचा जो योग ।
|| प्राप्तहि होता अष्टसिद्धिचा योग न तो भवरोग || १ ||
|| सर्वांठायीं समत्व असणें योग मुख्य हा जाणा ।
|| समत्व दृष्टिंत आलें ऐसा विरळा योगीराणा || २ ||
|| योगयुक्त जे ज्ञानी जगतीं निरिच्छ ते असतात ।
|| नित्य लोकसंग्रहास करुनी जन पावन करितात || ३ ||
|| आत्मानात्मविवेकें बुद्धी उपजे ज्या योगाला ।
|| दैवबळें तो प्राप्त होतसे स्वधर्मरतमनुजाला || ४ ||

२-२३

## पद ९ वें.

चाल—वैशाख मास वासंतिक.

॥ जन उत्सव करितात आजि पुण्य—पत्तनां ॥
॥ नेत्र भरुनि पाहिन मी श्रीगजानना ॥ धृ० ॥
॥ नवरत्नखचित पालखींत मूर्ति बसविली ॥
॥ चहुंफेर मोरचेल चौरि फार शोभली ॥
॥ बहु हय—रथ पथिकांचीं पथीं दाटि जाहली ॥
॥ पाहुनि आनंदलहरि येति मन्मनां ॥ जन० ॥ १ ॥

## पद १० वें.

राग काफी चाल—विधितनये पावगे.

॥ आनंदे नर्तनीं । जो शिवनंदन तुंदिलतनु तो ॥ धृ० ॥
॥ चरणिंनूपुरें रुणझुण वाजतिं । भक्तजन—मनोरथपूरक ॥ आ० ॥ १ ॥
॥ मधुरस्वरांहीं गान करी जो । अर्कसूनुगणभयहारक ॥ आनं. ॥ २ ॥
॥ ऋद्धिसिद्धि स्वाधीन जयाच्या । संतजना बहु सुखकारक ॥ आनं० ॥ ३ ॥

## पद ११ वें.

राग शंकराभरण ताल—धुमाळी.

॥ सर्व संकटें दूर करितसे ऐसा विघ्नहरा देवा ॥
॥ अनन्य भावें शरण मना हो सोडुनि गर्वकपट ठेवा ॥

॥ या निस्सारीं तूं संसारी श्रम पावसि कां समजोनी ।
॥ अति अप्राप्या नरतनु ऐशी तुजला न मिळे परतोनी ॥
॥ भजशीना कधिं स्मरशीना जरि पामरशीला ठेवोनी ।
॥ बुडशी भवजाळिं तरशील कसा जड शीलेपरि होवोनी ॥१॥

## पद १२ वें.

चाल—खचित बाई व्यर्थ०

॥ गजानन सुखकर हो सकला ॥ धृ०॥
॥ हिमनगकन्यासुत हा गजमुख । सर्वरूप नटला ॥ग०॥१॥
॥ स्थिरचरसर्वहि व्यापुनियां तो । अवशेषहि उरला ॥ग०२॥
॥ तच्चरणीं नत दासावरि जो । प्रेमें पाझरला ॥ग०॥३॥

## पद १३ वें.

चाल—पंचतुंडनररुंडमालधर.

॥ श्रीगणपतिचीं द्वादश नामें त्रिकाल कोणी जे गाती ।
॥सकलहि सिद्धी मिळति तयाला विघ्न—भयादिकही जाती ॥धृ०
॥ वक्रतुंड हें प्रथम नामहो, एकदंत दुसरें जाणा ।
॥ तृतिय कृष्णपिंगाक्ष व चवथें गजमुख ऐसें मनिं आणा ॥१॥
॥ लंबोदर हें नाम पांचवें, विकट सहावें नाम असे ।
॥ नाम विघ्नराजेंद्र, सातवें धूम्रवर्ण आठवें तसें ॥२॥
॥ नवम नाम हें भालचंद्रहो, नाम विनायक दशम म्हणा ।
॥ अकरावें तन्नाम गणपती व गजानन शेवटीं गणा ॥३॥

॥ नामें म्हणतां विद्या येई धनार्थि धनवान् जगिं होतीं ।
॥ सुपुत्र लाभति पुत्रेच्छूंतें मोक्षार्थ्यांस मिळे सुगती ॥४॥

## पद १४ वें.

रा० धनाश्री चाल—भक्ती आकळिला.

॥ परशुधरा जारे शरण तूं० ॥धृ०॥
॥ जगरूपी हें नाटक पाहुनि । भुलसी सुमनारे ॥शर०॥१॥
॥ काळमुखीं हें जाइल विलया । अवघें जग सारें ॥१॥२॥
॥ आसक्तीनें तुजसि वासना । बद्धचि करतिलरे ॥श०॥३॥
॥ स्वकर्तव्य करितां, भजकाचे । चुकतिल भव फेरे ॥श०॥४॥

## पद १५ वें.

चाल—नरा करीरे त्वरा शरण तूं.

॥ अनेक साधन सोडुनि सुमना गजमुखचिंतन करी ।
। समज धरि कांहिं तरी अंतरीं ॥धृ०॥
। परिस आपुल्या घरीं असुनि कां करीं घेशि खापरी ।
। गोष्ट ही खरी. नसे मस्करी ।
। बरी अन्य सुंदरी जरी सुखकारि परी विषसुरी ।
घेशि कां मारुनि अपुल्या उरीं ॥ चाल ॥
। गणनाथस्मरणें पाप जळुनि जातसे ।
। परिणाम हळुहळु बुद्धीवर होतसे ।

। ते भक्त भीष्म हनुमंत प्रतापी कसे ॥
॥ ब्रम्हचर्य पाळतां पूर्ण मग तेज दिसें स्वशरिरीं ।
। इतर गुण करिति न त्याचो सरी ॥अने०॥१॥

## पद १६ वें.

रा. कालिंगडा चाल—असे कोपयुक्त.

॥ आनंद—सागरास मार्ग दाखवी मना ॥धृ०॥
। सुपथ चुकुनि भ्रमण करित । आड वाट जाइ धरित ।
। हृदय होय दुःख भरित । गौरिनंदना ॥आनंद०॥१॥
। लोभ—मोह—तस्कर हे दाविती भिती ।
। काम—क्रोध जबर शत्रु फार गांजिती ।
। शेष बहुत दुर्मति ते वाट अडविती ।
। पाहाशील किति तुं अंत । तूंचि अनादि आदिअंत ।
। लागलि त्वच्चरणखंत । घोर भववना ॥आनं०॥२॥

## पद १७ वें.

रा. परज चाल—किति कपटि असशि.

॥ मज दावि चरण गणनाथा ॥धृ०॥
॥ अकर्तव्य—कर्तव्य कळेना । आसक्ती तों मुळिंच गळेना ॥
॥ कांहिं सुचेना आतां । मज दावि० ॥१॥
॥ नाथ गणांचा तूं गणराया । प्रेरक असशी सकल इंद्रिया ॥
॥ कोण तुझ्याविण त्राता । मज दावि०॥२॥

## पद १८ वें.

चाल—मोहे लागि लटक.

॥ मनिं भाव धरुनि नमुं गणपतिला ॥ धृ० ॥
॥ सकल गणांचा नाथ गजानन । प्रेरिल तो नित सन्मतिला ॥
॥ मनिं० १ ॥ अखिल कला—विद्येचा दाता । देइल गुण—यश—कीर्तिला ॥ मनिं० ॥ २ ॥ भजक म्हणे विश्वास असे मज । ॥ तोचि हरिल भव—भीतिला ॥ ३ ॥

## पद १९ वें.

रा. भैरवी चाल—या विरहा कां भीसी.

॥ निज धर्मा तूं पाळी । सुमना ॥ धृ० ॥
॥ वागत जावें धर्माज्ञेनें । सर्व कुतर्क पिटाळीं ॥ सु० ॥ १ ॥
॥ स्वधर्मरत जो मानव त्यातें । अपयश ना कधिकाळीं ॥ सु० ॥ २ ॥
॥ परधर्म भयावह ऐसें तें । गीतावच प्रतिपाळी ॥ सुमना० ॥ ३ ॥
॥ धर्माचरणें गजवदनकृपा । होइल उचिताचे काळीं ॥ सु० ॥ ४ ॥

## पद २० वें.

रा. असावरी चाल—राम स्मरावा राम.

॥ देइ सुमति आम्हांस । गणेशा देइ० ॥ धृ० ॥
॥ नित्य होउं दे मंगल येथें, दूर करुनि विघ्नास ॥ गणेशा देइ० ॥ १ ॥

॥ अन्योन्यांत सुमेळ राहुनी, वृद्धि असो प्रेमास ॥गणे०॥ २॥
॥ सत्कार्ये हातूनि व्हावया, ठेवि अम्हा न उदास ॥गणे०॥ ३ ॥
॥ रिद्धि-सिद्धि-सुख सकलहि लाभो, वाव नसो दुःखास ॥गणे०॥४॥

## पद २१ वें.

चाल—नृपालकोप शांतवीन.

॥ आमुची विनंति ही तुला गजानना ॥
॥ दुःख हरुनि पुरवि तूंचि सर्व कामना ।
॥ मार- रिपुकुमार तुं सुकुमार गजमुखा ॥
॥ कृपा करी, अम्हांवरी, कसाही, आतां अभय दे मना ॥१॥

## आरती.

रा. मालकौंस ताल दादरा.

॥ आरति ओवाळितों मि श्रीगजानना रे ॥धृ०॥
॥ नानापरीचे सुदीप । लाउनि ते तुजसमीप ॥
॥ वाटे आनंदनीप । लाधला मला रे ॥आरति०॥१॥
॥ मम दुर्गुण सर्व क्षरवि । सत्कृत्यें बहुत करवि ॥
॥ द्वैत—भाव शीघ्र हरवि । हे कृपाघना रे ॥आरति०॥२॥
॥ लक्ष्मण त्वच्चरणिं शरण । चुकवी तज्जन्ममरण ॥
॥ लोपवि अज्ञान भगण । ज्ञान—भास्करा रे ॥आरति०॥३॥

समाप्त